॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572**
**Phone: (02462) 215325**

## Public Relations Office (PRO)
**जनसंपर्क कार्यालय**

**website: srtmun.ac.in**
**E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/१५९ दि.२३/०९/२०२४

### 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिनानिमित्त परेड साठी निवड शिबिराचे आयोजन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये दि. २६ जानेवारी २०२५ या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्रातून राष्ट्रीय सेवा योजना मधून राष्ट्रीय व राज्य परेड (पथसंचलन) साठी निवड शिबिराचे आयोजन दि. २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान करण्यात येत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना ही भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये चालवली जाणारी विद्यार्थ्यांची एक सामाजिक चळवळ आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतून सामाजिक अशी विविध उपक्रम घेतली जात असतात. यापैकीच एक प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी जनपथ नवी दिल्ली या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून पथ संचालनाची परेड होत असते. त्या परेड पूर्व संचलन निवड शिबिराचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये दि. २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान निवड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन कार्यक्रम दि. २६ सप्टेंबर रोजी स. ११:०० वा. विद्यापीठाच्या दिक्षान्त सभागृहात संपन्न होणार आहे.

या शिबिरासाठी स्वयंसेवक आणि स्वयंसेविका मिळून ७४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. त्यापैकी १२ विद्यार्थी राष्ट्रीय परेड साठी पाठवले जातात आणि उर्वरित ६२ विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय होणाऱ्या परेड साठी पाठविण्यात येते. या निवडीमध्ये मुख्यत्वे करून विद्यार्थ्यांची उंची, रनिंग, धडधाकटपणा आणि सतर्कता इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जातात.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून क्षेत्रीय निदेशक राष्ट्रीय सेवा योजना युवा कार्य व क्रीडा मंत्रालय भारत सरकारचे श्री. अजय शिंदे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई येथील डॉ. निलेश पाठक, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मलिकार्जुन करजगी हे उपस्थित राहणार आहेत.

सदरील प्रजासत्ताक पूर्व संचलन शिबिरासाठी महाराष्ट्रातील ५१ विद्यापीठातील कृषी, तंत्रज्ञान, अकृषी, आरोग्य, पशुवैद्यकीय, महिला विद्यापीठ अशा विविध महाराष्ट्रातील विद्यापीठातून १६५ मुले स्वयंसेवक व १७४ मुली स्वयंसेविका तसेच या शिबारासाठी ९ पुरुष व १० महिला यांचा संघ व्यवस्थापक म्हणून सहभाग राहणार आहे.

या शिबिरासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

---